राज्यातील भविष्यातील पाणी टंचाई निवारणार्थ पुढील नियोजनासाठी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा सन २०१७-१८ तयार करणे.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः टंचाई २०१७/ प्र.क्र १४९ /पापु १४

जी.टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,

मंत्रालय, मुंबई ४०००३२

तारीख: ०६ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई १०९९/प्र.क्र. १२/ पापु-१४, दिनांक ०३ फेब्रुवारी, १९९९

२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई १००७/प्र.क्र.१९७/ पापु-१४, दिनांक २७ फेब्रुवारी, २००८

३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २००८/प्र.क्र.१४९/ पापु-१४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९

४) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २०१४/प्र.क्र.४८/पापु-१४, दिनांक ०६ मे, २०१४

५) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक टंचाई २०१६/प्र.क्र.३२४/पापु-१४, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६

शासन परिपत्रक

राज्यात दरवर्षी अपु-या पर्जन्यामुळे किंवा अन्य कारणामूळे ग्रामीण/ नागरी क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असते. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपयोजनांबाबत कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून या विभागाकडून संदर्भ क्र. १, २ व ३ येथील शासन निर्णयान्वये स्थायी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर स्थायी आदेशानुसार पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणा-या उपाययोजना

३० जून पर्यंत राबविण्यात येतात. राज्यात यावर्षी समाधानकारक पाऊस असला तरी काही क्षेत्रामध्ये पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी झालेले आहे. अशा क्षेत्रात येत्या उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या संदर्भाधिन स्थायी आदेशातील सुचनांच्या अनुषंगाने आता पासूनच तत्परतेने कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत:-

१) महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियमातील कलम ३ नुसार घोषित केलेल्या सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताच्या ठिकाणापासून ५०० मिटीरच्या अंतरात, पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त, इतर प्रयोजनासाठी विहिर खोदण्यास परवानगी न देणे, कलम ५ नुसार पिण्याच्या पाण्याच्या उद्भवापासून १ कि.मी.च्या परिसरात असणा-या स्त्रोताच्या उपशावर निर्बंध आणणे, कलम ७ नुसार जे अति उपशाचे पाणलोट क्षेत्र असेल त्या क्षेत्रात पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजना व्यतिरिक्त, इतर प्रयोजनासाठी, विहिर खोदण्यास परवानगी न देणे, कलम ८ नुसार अति उपशाच्या पाणलोट क्षेत्रातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या उद्भवावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या विहिरीमध्ये पाण्याचा उपसा बंद करणे या तरतूदींचे तसेच कलम ९ व १६ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे व भूजल उपशावर नियंत्रण आणावे.

२) पाणी टंचाई निर्माण झालेल्या गावे / वाडयांमध्ये तसेच नागरी क्षेत्रात आवश्यकतेनुसार स्थानिक परिस्थिती व स्त्रोतांचा विचार करुन पाणी टंचाई निवारणार्थ प्रस्तावित किमान खर्चाच्या योग्य अशा उपाययोजना घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी.

३) संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये राज्यात पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना ग्रामस्तरावर राबविण्याबाबतच्या सूचना निर्ममित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार आतापासूनच पाण्याचे स्त्रोत बळकटीकरणासाठी, शिवकालीन पाणी साठवण योजनांसह जलसंधारणाच्या विविध उपाययोजना राबविण्याचा कार्यक्रम हाती घ्यावा.

४) संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांनुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमधील वरिष्ठ भूवैज्ञानिक, सहायक भूवैज्ञानिक, कनिष्ठ भूवैज्ञानिक यांनी संभाव्य टंचाई ग्रस्त पाणलोट क्षेत्र निहाय व गाव निहाय आराखडे तयार करण्याची कामे प्राथम्य क्रमाने हाती घ्यावीत. तसेच प्रत्येक जिल्हयांमधील ज्या तालुक्यामध्ये सरासरीपेक्षा ५० टक्के कमी पाऊस पडला आहे. तसेच पाण्याची पातळी सरासरी पातळीपेक्षा २ मीटरने खाली गेलेली आहे. अशा तालुक्यामधील गावातील यादी तातडीने तयार करावी.

५) अशा गावात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, जल स्वराज्य टप्पा-२ व मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम इत्यादी योजनांतर्गत चालू असलेल्या योजनांचे स्रोत युध्दपातळीवर पूर्ण करुन त्यातील पाण्याचा लाभ गावाला लवकर मिळेल याकरीता कार्यवाही करण्यात यावी.

६) प्रत्येक जिल्हयातील अस्तित्वात असलेल्या विंधण विहिंरीची वेळोवेळी दुरुस्ती करुन त्या चालू अवस्थेत ठेवणेबाबत जिल्हाधिका-यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

७) जिल्हयामध्ये अनेक योजना या मोठया, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या पाण्यावर अवलंबून असतात. अशा ठिकाणी पिण्याच्या पाण्याची नेमकी गरज किती आहे याचा अंदाज घ्यावा. या प्रकल्पाच्या जलाशयात आवश्यक तेवढे पाणी पिण्याकरीता राखून ठेवून त्याच्या वापराबद्दल नियोजन करावे. पाण्याचा अनिर्बंध उपसा तसेच अपव्यय होणार नाही याबाबत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थानी दक्षता घ्यावी.

८) राज्यातील संभाव्य पाणी टंचाईग्रस्त गावे/वाड्यांसाठी शासनाच्या स्थायी आदेशातील विहीत उपाययोजनांपैंकी योग्य उपाययोजनांचा सन २०१७-१८ साठी संभाव्य टंचाई कृती आरखडा करुन शासनास सादर करण्यात यावा. सदरचा कृती आराखडा तयार करताना ज्या योजनांचा लाभ टंचाई कालावधीतच होऊ शकेल अशा तुलनात्मक कमी खर्चाच्या उपाययोजना प्रस्तावित करण्यात येतील याची जाणीवपूर्वक दक्षता घ्यावी. सन २०१६-१७ मधील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घेण्यात येण्याऱ्या उपाययोजना व प्रत्यक्षात घेण्यात आलेल्या उपाययोजनांची संख्या यात लक्षणीय फरक आढळून आला आहे. तरी संभाव्य टंचाई कृती आराखड्यातील प्रस्तावित उपाययोजनांची संख्या अचूकपणे नोंदवावी.

९) पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणासाठी करावयाच्या तातडीच्या उपाययोजना ठरवितांना त्यासाठी होणारा खर्च, त्याचा भविष्यात होणारा फायदा तसेच त्या उपाययोजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारा वेळ याबाबींचा प्रामुख्याने विचार करण्यात यावा. टंचाई निवारण उपाययोजनेची निवड करताना ती उपलब्ध माहिती, टंचाईचा कालावधी व स्थानिक परिस्थितीचा विचार करता किमान खर्चाची असावी याची दक्षता घेण्यात यावी. याप्रमाणे तयार केलेल्या टंचाई कृती आराखडयाच्या कार्यान्वयनाचे संनियंत्रण जिल्हाधिकारी यांच्याकडे राहिल.

१०) ज्या ठिकाणी अन्य तातडीच्या उपाययोजना घेता येत नाहीत तेथे टँकर, बैलगाडीव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. टँकरव्दारे पाणी पुरवठा करताना शक्यतो

शासकीय टँकरचा वापर करण्यात यावा असे शासनाचे धोरण आहे. तथापि, असा अनुभव आहे की, जिल्हाधिकारी ज्यावेळी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी संबंधित विभागाच्या क्षेत्रिय अधिका-याकडे टँकरची मागणी करतात त्यावेळी त्यांना अनेकदा सुस्थितीत नसलेले वा वापरात नसलेले टँकर पुरविले जातात. परिणामी जिल्हाधिकाऱ्यांना खाजगी टँकर्स या कामी भाडयाने घेणे भाग पडते व शासकीय खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना अशा सक्त सुचना देण्यात येत आहेत की, त्यांनी त्यांच्या अधीन असलेले टॅकर्स सुस्थितीत ठेवावे आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हाधिकारी ज्या वेळी मागणी करतील त्यावेळी त्यांना पूर्णपणे कार्यक्षम स्थितीतील टँकर्स त्वरेने पुरविण्यात यावेत.

११) आपल्या विभागातील पाणी टंचाई निवारणार्थ उपसा बंदीचे आदेश पारीत करुन अथवा तात्पुरत्या उपाययोजना करुन कायमची टंचाई दूर होणार नाही, हे निदर्शनास आल्यास क्षेत्रिय यंत्रणेने नियोजन व माहितीचे संकलन करणे आवश्यक आहे. त्यासाठी गेल्या पाच वर्षात टँकर्सने पाणी पुरवठा केलेल्या गावांची तालुका व वर्षनिहाय गावे/वाड्यांची यादी,या गावांचे नकाशे व टँकरवर झालेल्या खर्चाची माहिती इत्यादी माहितीचे संकलन करुन त्याआधारे पुढील नियोजनासाठी संभाव्य टंचाई कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. तसेच टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करताना टँकर फेऱ्यावरील नियंत्रण ठेवण्याकरिता नवीन निविदा स्वीकारताना व टँकरधारकांबरोबर करारनामे करताना टँकरवर GPS यंत्रणा बसविण्याबाबत तसेच सदर यंत्रणेची देखभाल दुरुस्ती टँकर वाहतुकदाराने स्वत:च्या खर्चातून करण्याबाबतची अट नमुद करावी.

१२) आपल्या विभागातील नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना मान्यता देण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयामार्फत होणारी दिरंगाई टाळण्यासाठी संदर्भ क्र. ३ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार विहित आर्थिक व भौतिक निकषात न बसणारे प्रस्ताव सबळ कारण आणि सुस्पष्ट शिफारशीसह शासनाकडे सादर करावेत. तसेच संभाव्य टंचाई कृती आराखडे अपेक्षित खर्चासह शासनास सादर करावेत, ही विनंती .

२. एकंदरीत पिण्याच्या पाण्याच्या टंचाई क्षेत्रात पाणी पुरवठा सुरळीत व्हावा व त्यावरील शासकीय खर्च मर्यादित रहावा यासाठी वरील सुचनांचे तसेच उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१००४१११३३०९५०२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2017.10.06 17:27:13 +05'30'

म.भ.सावंत
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
४. सर्व जिल्हाधिकारी,
५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
६. सर्व मुख्याधिकारी,नगर परिषद,
७. सर्व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
८. सर्व विभागीय उप संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
९. सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
१०. सर्व विभागीय मुख्य अभियंता, महारष्ट्र जीवन प्राधिकरण,
११. सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
१२. सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
१३. प्रधान सचिव (पा.पु.व स्व.वि.) यांचे स्वीय सहाय्यक,
१४. निवड नस्ती, कार्यासन, पापु-१४.